**जाहिरात**

# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

## म.न.पा. नागपूर अंतर्गत

## कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

## आरोग्य विभाग सिव्हिल लाईन्स, महानगरपालिका नागपूर.

---

कंत्राटी पदभरती २०२३-२४

आरोग्य विभाग महानगरपालिका नागपूर यांचे नियंत्रणाखालील कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी म.न.पा. नागपूर अंतर्गत १५ वा वित्त आयोग अंतर्गत कंत्राटी स्वरुपात पदे भरण्याकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(म.न.पा. चे संकेतस्थळ : **www.nmcnagpur.gov.in**)

भरावयाचा रिक्त पदांचा तपशिल

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या व जातीचा प्रवर्ग | | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह मानधन | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जातीचा प्रवर्ग | संख्या | | | |
| १ | स्टाफ नर्स (१५ वा वित्त आयोग **U-HWC)** | अ.जा. (SC) | ११ | GNM कोर्स किंवा B.SC (Nursing) व महाराष्ट्र नर्सींग कॉन्सीलची नोंदणी आवश्यक, (अनुभव असल्यास प्राधान्य.) | रु. २०,०००/- | मागासवर्गीय करीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे व खुल्या प्रवर्गाकरीता कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे |
| | | अ.ज. (ST) | ८ | | | |
| | | वि. जा. (अ) (VJ-A) | ३ | | | |
| | | भ.ज. (ब) (NT-B) | ३ | | | |
| | | भ.ज. (क) (NT-C) | ४ | | | |
| | | भ.ज. (ड) (NT-D) | २ | | | |
| | | वि.मा.प्र. (SBC) | २ | | | |
| | | इ.मा.व. (OBC) | १० | | | |
| | | इडब्लुएस (EWS) | १० | | | |
| | | खुला (OPEN) | २८ | | | |
| | | एकुण | ८१ | | | |

अर्ज करण्याची पद्धत :-

१) उमेदवारांनी पुढील दिलेल्या लिंकवर https://forms.gle/XfqZFXcrcTej7po67 ऑनलाईन अप्लीकेशन करणे अनिवार्य आहे. मोबाईल किंवा कम्प्युटर द्वारे सदर अर्ज भरल्या जाईल.

२) कागदपत्र अपलोड करतांना पीडीएफ किंवा इमेज (PDF or Image )अपलोड करावे. कागदपत्र सेव्ह करतांना कागदपत्रांना स्वत:चे नाव दयावे.

३) अनुभवाचे कागदपत्र अपलोड करतांना सर्व अनुभव कागदपत्र एकच पीडीफ (PDF) करावे. जास्तीतजास्त १० एमबी (10 MB) पर्यंत अपलोड होऊ शकतात.

४) उर्वरीत आवश्यक कागदपत्र फाईल साईज १ एमबी (1 MB ) पर्यंत असणे आवश्यक आहे.

५) अपलोड केलेले कागदपत्र हे सुस्पष्ट व वैध असावेत. मुळ कागदपत्र स्कॅन करुनच अपलोड करावेत.

६) अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीने स्विकारले जातील. ऑफलाईन अर्जाचा विचार केल्या जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

ऑनलाईन अर्ज करण्याचा दिनांक :- १३/१२/२०२३ ते १८/१२/२०२३ पर्यंत ५.०० वाजेपर्यंत

सदर पदांकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार नसुन उमेदवारांच्या गुणांची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifing Exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टककेवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = 60*50/100=30) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण.<br>मिळालेल्या एकुण गुणांच्या टककेवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.१. स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.SC (Nuring) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% Proportion प्रमाणे =60*20/100=12 गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | शासकीय अनुभव प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण व खाजगी अनुभव प्रत्येक वर्षासाठी ३ गुण<br>(जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकुण १०० गुण |

## अटी व शर्ती

१) अनुभवाच्या बाबतीत खाजगी, शासकीय, निम शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असलेला अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

२) सदर पदांकरीता शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येणार नाही.

३) मेरीट लिस्टनुसार व अनुभवाच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात येईल.

४) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

५) सदरील पदे हि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत निव्वळ कंत्राटी स्वरुपाची राहतील. त्यांचा नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसलाही संबंध राहणार नाही. पदांसाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

६) वरील सर्व पदे ही कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत असल्याने त्यास नागरी सेवा नियम लागू होणार नाही.

७) एकुण पदांच्या संख्येत अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

८) सदरील पदे हि निव्वळ कंत्राटी पद्धतीने केवळ प्रकल्प कालावधी पुरते भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदर पदे आपोआप संपुष्टात येतील.

९) अर्जासोबत जोडावयाची शैक्षणिक कागदपत्रे:-

- नुकताच काढलेला पासपोर्ट साईझ फोटो-१ व स्वत:चा ई-मेल व दुरध्वनी क्रमांक
- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा राहिवासी असल्याचे प्रमाणपत्र
- जन्म तारखेचे प्रमाणपत्र (शाळा/महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र/जन्माचे प्रमाणपत्र)
- ओळखपत्र-आधार कार्ड/मतदान कार्ड/ड्रायव्हिंग लायसंस
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेची अंतिम वर्षाची गुणपत्रीका व पदानुसार शासनातर्फे प्राप्त रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
- पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेशिवाय प्राप्त पदव्युत्तर पदवी (PG Degree) आणि पदव्युत्तर पदवीका (PG Diploma) प्रमाणपत्र

१०) उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.

११) उमेदवारांनी अर्ज करीत असलेलया पदाचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

१२) कोणत्याही वेळेस भरती अथवा निवड प्रक्रिया रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समिती एन.यु.एच.एम. म.न.पा. नागपूर यांना राहतील त्यावर कोणतीही हरकत/आक्षेप घेता येणार नाही.

१३) आवेदन पत्र स्विकृत/अस्विकृत करण्याचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करण्याचे तसेच त्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याबाबतचे संपुर्ण अधिकारी अध्यक्ष निवड समिती तथा आयुक्त म.न.पा. नागपूर यांचेकडे राखुन ठेवलेले आहे.

१४) उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाब आणल्यास त्यांना नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१५) निवड झालेल्या उमेदवाराने रुजु होतांना विहित नमुन्यात रुपये १००/- च्या बॉन्डपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. (सेवेदरम्यान करारनाम्याच्या अटी काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.)

१६) ज्या पदाकरीता बिंदू नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेद्वारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

१७) उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज करु नये.

१८) उमेदवार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१९) खाजगी अनुभव प्रमाणपत्रामध्ये आवज-जावक क्रमांकाची व तारखेची नोंद असावी तसेच नियुक्तीच्या अटी-शर्ती, करारनामा, आदेश कार्यालयात सादर करावा. तसेच खाजगी अनुभव हा मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलमधील असावा. अनुभव प्रमाणपत्र पडताळणी केल्यानंतर खोटे अनुभव सादर केल्यास त्यांचेवर कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल.

सदर पदभरती प्रक्रियत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व सदर पदभरती अंशतः किवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखुन ठेवले आहेत. कृपया अर्जदाराने याची नोंद घ्यावी.

- स्वा -

वैद्यकिय आरोग्य अधिकारी तथा सचिव
निवड समिती (एन.यु.एच.एम.) महानगरपालिका, नागपूर